फ्लॅट भाड्याने घेऊन लैंगिक शोषण

आरोपीची कबुली; लैंगिक शोषणप्रकरण, अटकेतील आरोपींची संख्या ८ वर

अमरावती, ब्युरो. परतवाडा येथील लैंगिक शोषण प्रकरण आणि सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या आक्षेपार्ह व्हिडीओंमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली असून या प्रकरणात दररोज नवे धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. मुख्य आरोपी अयान अहमद तनवीर अहमद याने पोलिस चौकशीत कबुली देताना मुलींचे लैंगिक शोषण केवळ स्वतःच्या विकृत आनंदासाठी करत असल्याचे सांगितले. शहरातील एका मित्राचा फ्लॅट भाड्याने घेऊन तेथे अत्याचार करून त्याचे व्हिडीओ चित्रीकरण केल्याचीही कबुली त्याने दिली. या प्रकरणात गुरुवारी पोलिसांनी मानव दीपक सुगंधे याला सहआरोपी घोषित केले. तसेच सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या व्हिडीओंशी संबंधित आणखी सहा जणांनाही आरोपी करण्यात आले आहे. त्यामुळे मुख्य आरोपीसह या प्रकरणात एकूण ८ आरोपींना ताब्यात घेतले आहे. यापूर्वी अटक करण्यात आलेल्या ४ आरोपींव्यतिरिक्त, गुरुवारी अटक करण्यात आलेल्यांमध्ये मानव सुगंधे (२०, रा. आरवी, एचएमयू, अमरावती), ऐफाज खान, मंजूर खान (२६), मोहम्मद इम्रान मोहम्मद साजिद (२१) तसेच सोशल मीडियावर व्हिडीओ क्लिप प्रसारित करणारा शाई नवीद शाई हसन (२१) यांचा समावेश आहे. हे तिघेही अचलपूर येथील रहिवासी असल्याचे सांगितले जाते.

गुरुवारपर्यंत पोलिस कोठडी

गुरुवारी अटक करण्यात आलेल्या ४ आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना २३ तारखेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या चौघांच्या सखोल चौकशीतून आणखी आरोपी समोर येण्याची शक्यता असल्याचा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

फ्लॅटमधून संशयास्पद साहित्य जप्त

मुख्य आरोपी अयान अहमद याने पोलिसांना सांगितले की, त्याने पीडितेचे शोषण विविध ठिकाणी केले. यात परतवाडा येथील वज्जर धरण, अमरावती शहरातील दोन ठिकाणे तसेच अमरावती व परतवाडा येथील तीन कॅफे यांचा समावेश आहे. चौकशीत अयानने अमरावतीत त्याचा मित्र मानव दीपक सुगंधे याचा फ्लॅट भाड्याने घेतल्याचा खुलासा केला. मूळचा आर्वी येथील असलेला सुगंधे सध्या गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कठोरा नाका परिसरात भाड्याच्या फ्लॅटमध्ये राहतो. पोलिसांनी त्या फ्लॅटची झडती घेऊन काही संशयास्पद साहित्य जप्त केले आहे.

लॅपटॉप, हार्ड डिस्कसह साहित्य जप्त

पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, एहफाज खान मंजूर खान (२६) यांच्या घराची झडती घेतली असता १ लॅपटॉप, १ हार्ड डिस्क आणि १ टॅब्लेट जप्त करण्यात आला आहे. हे सर्व साहित्य फॉरेन्सिक तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले. दरम्यान, अटक करण्यात आलेल्या आरोपींच्या मोबाईल फोनमधून ८ मुलींचे १८ व्हिडिओ आणि ३९ फोटो जप्त करण्यात आले आहेत.

पीडितांनी पुढे यावे : पोलिस अधीक्षकांचे आवाहन

पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी या प्रकरणातील पीडित आणि त्यांच्या कुटुंबीयांना पुढे येऊन तक्रार दाखल करण्याचे आवाहन केले आहे. सर्व पीडितांची आणि त्यांच्या कुटुंबीयांची नावे पूर्णपणे गोपनीय ठेवली जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहनही पोलिस प्रशासनाने केले आहे.

आणखी एका पथकाची स्थापना

पीडित मुली पुढे का येत नाहीत, तसेच पूर्वीच्या तक्रारी का नोंदवून घेतल्या नाहीत, यासारख्या आरोपांची चौकशी करण्यासाठी एका एसडीपीओच्या देखरेखीखाली स्वतंत्र पथक तयार करण्यात आले आहे. हे पथक सखोल चौकशी करून आपला अहवाल सादर करणार असल्याचे पोलिस अधीक्षकांनी सांगितले.

५ एकरातील गहू जळून खाक

शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान, भरपाईची मागणी

अल्लीपूर (ता. प्र.). डीपीवरील शॉर्ट सर्किटमुळे गुरुवारी दुपारी लागलेल्या भीषण आगीत अल्लीपूर शेततली ५ एकरांवरील गव्हाचे उभे पीक जळून खाक झाले. या घटनेत शेतकरी हेमंत मधुकरराव कुकलकर यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. आगीत शेतीपयोगी साहित्याचेही मोठे नुकसान झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, शेतातील डीपीवर अचानक शॉर्ट सर्किट आगीने रौद्ररूप धारणे केले. ही आग वाऱ्यामुळे झपाट्याने पसरत गेली आणि पाहता पाहता संपूर्ण गव्हाच्या शेताला वेढा घातला. या आगीत सुमारे ५ एकरांवरील उभे गहू पीक पूर्णतः जळून खाक झाले. आगीच्या तडाख्यात पिकाला पाणी देण्यासाठी वापरले जाणारे ४० ते ५० स्प्रिंकलर व ठिबक पाईप जळून नष्ट झाले. तसेच शेतातील झोपडीत ठेवलेले विविध शेतीपयोगी साहित्यही आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. कुकलकर यांनी शेतात लावलेल्या केळी पिकालाही आगीची झळ बसली.

घटनेची माहिती मिळताच शेतकरी हेकुकलकर यांनी तत्काळ अग्निशमन दलाशी संपर्क साधला. अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी तातडीने दाखल झाले आणि आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. अग्निशमन दल वेळेत पोहोचल्यामुळे आग आटोक्यात आणण्यात आली. दरम्यान, या आगीत मोठे नुकसान झाल्याने शासनाने तत्काळ पंचनामा करून योग्य ती नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी कुकलकर यांनी केली आहे. तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी वीज यंत्रणांची नियमित तपासणी करावी, अशी मागणीही परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.



गायीला गंभीर दुखापत

दरम्यान, या घटनेत शेतातील एका गायीला आगीची झळ बसून ती जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे शेतकऱ्याच्या आर्थिक नुकसानीसोबतच जनावरांनाही फटका बसला आहे.

अकोला जगातील सर्वाधिक हॉट शहर

उष्णतेची लाट, पारा ४४. २ अंश सेल्सिअस

अकोला, ब्युरो. जिल्ह्याला मार्च महिन्यापासून उन्हाचे तडाखे बसत आहे. याच महिन्यात अकोल्याच्या उच्चांकी तापमानाची राज्यात नोंद झाली होती. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापासून तर तापमानाचा पारा अधिक वाढता आहे. गुरुवारी ४४.२ अंश सेल्सिअस असे उच्चांकी तापमान नोंदविण्यात आले.

मागील आठवड्यापासून तापमानाचा पारा सातत्याने वाढत आहे. मध्य भारतातील विदर्भ तापमानाचे सर्वाधिक चटके सोसणारे शहर बनले. सुमारे २ दिवसापुर्वी राज्यात विदर्भातील सर्वाधिक ४२ अंश सेल्सिअस तापमानाची अकोल्यात नोंद झाली होती. त्यानंतर शहराच्या तापमानात घट होण्याचे नाव नसून, उलट तापमान दररोज काही अंशाने वाढतच आहे. गुरुवारी ४४.२ अंश सेल्सिअस तापमान नोंदविण्यात आल्याने पुन्हा अकोला तापमानात अव्वल ठरला. नागरिक घराबाहेर पडताना आवश्यक ती खबरदारी घेत आहे. जिल्हा आरोग्य यंत्रणाही देखील कामाला लागली. जिल्हा सर्वोपचार रुग्णालय, प्रत्येक पीएससीत उष्माघात कक्षासह स्वतंत्र खाटांची व्यवस्था करण्यात आली.

जामीनदाराला ६ महिन्याची शिक्षा

वर्धा, ब्युरो. धनादेश अनादरच्या एका प्रकरणात वर्धा येथील न्यायालयाने जामीनदाराला दोषी ठरवत कठोर शिक्षा सुनावली आहे. न्यायालयाने व्यावसायिक रितेश भरतभाई गांधी यांना सहा महिन्यांच्या कारावासासह ५ लाख रुपयांचा दंड व भरपाई देण्याचे आदेश दिले आहे. तसेच, निर्धारित रक्कम जमा न केल्यास अतिरिक्त ४ महिन्यांच्या कारावासाची शिक्षादेखील ठोठावली आहे. हा निकाल वर्धाचे तृतीय अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी स्वाती फुलबांधे यांनी दिला. प्राप्त माहितीनुसार, २०१९ मध्ये कर्जदार विशाल भाके यांनी जय महाकाली नागरी सहकारी पतसंस्था, वर्धा येथून ४ लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. या कर्जासाठी गांधी हे जामीनदार होते.

विकासासाठी विद्यार्थ्यांनी पुढे यावे

राष्ट्रपतींचे सेवाग्राम आश्रमात राष्ट्रपित्याला अभिवादन

वर्धा, ब्युरो. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे वास्तव्य लाभलेला वर्धा जिल्हा आहे. गांधीजींनी त्यावेळी पाहिलेले विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी विद्यार्थ्यांचे मोठे योगदान अपेक्षित आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वैयक्तिक प्रगतीसोबत देशाला सशक्त, आत्मनिर्भर व विकसित भारत बनविण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले.वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात त्या बोलत होत्या. यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, कुलपती प्रो. कुमुद शर्मा उपस्थित होते. महात्मा गांधी यांच्या आत्मनिर्भरतेच्या विचारांचा उल्लेख करत राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या, नवकल्पना, मूल्याधारित शिक्षण आणि सामाजिक बांधिलकी यांच्या आधारावरच विकसित भारताचे स्वप्न साकार होऊ शकते.

राष्ट्रपती मुर्मू यांनी वर्धा जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना सेवाग्राम येथील गांधी आश्रम गाठून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना अभिवादन केले. सेवाग्राम आश्रम भेटीदरम्यान त्यांनी प्रार्थना सभेत सहभाग घेतला तसेच परिसरात वृक्षारोपण करून निसर्ग संवर्धनाचा संदेश दिला. राष्ट्रपती मुर्मू यांचे सेवाग्राम येथील हेलिपॅडवर आगमन झाल्यावर त्यांचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा, महसूल मंत्री बावनकुळे, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी स्वागत केले.

भरधाव कारच्या धडकेत दुचाकीस्वार दोन ठार

चंद्रपूर, ब्युरो. वणी-वरोरा राज्यमार्गावर भरधाव येणाऱ्या एका कारने दुचाकीला मागून जोरात धडक दिल्याने झालेल्या अपघातात २ जणांना प्राण गमवावे लागले. तर २ जण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना बुधवारी दुपारी घडली.बांधकाम मिस्त्री म्हणून काम करणारे प्रदीप ठमके (३१, रा. वांजरी) हे आपल्या दुचाकीने आपले सहकारी अनिल कुत्तरमारे (४०, रा. मानकी) सोबत शेंबळ या गावाकडे जात होते.

दुपारी १२.१५ वाजेच्या सुमारास पाटाळा पुलाजवळ मागून येणाऱ्या एका कारने (एम.एच.-१४/जीडी ६८३५) दुचाकीला जबर धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की, दुचाकीस्वार अनिल कुत्तरमारे यांचा जागीच मृत्यू झाला व प्रदीप ठमके हे गंभीररित्या जखमी झाले.

Short News

एकाच क्रमांकाची २ वाहने

4यवतमाळ, ब्युरो. लग्नसराईच्या दिवसात प्रवाशी कॅश करण्यासाठी एका जणाने सारख्या क्रमांकाची वाहने तयार करून शासनाची फसवणूक केल्याचा प्रकार गुरुवारी महागाव तालुक्यातील फुलसागावगी येथे उघडकीस आली. या बाबीचा स्थानिक गुन्हेशाखेने पर्दाफाश करीत दोन्ही वाहने जप्त केली.

सहकार विभागाची ज्वेलर्सवर धाड

4वाशिम, ब्युरो. वाशिम तालुक्यात अवैध सावकारी व्यवहारांबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सहकार विभागाने मोठी कारवाई करण्यात आली. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम १६ अंतर्गत झडतीची कारवाई केली. ही कारवाई रुख्मीनी ज्वेलर्सचे मालक सुशिल चिमणाजी बेदरकर यांच्यावर करण्यात आली. गुरुवारी सहकार व पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई पार पाडली .या मोहिमेत सहायक निबंधक एम. डी. कच्छवे, मुख्य लिपिक आर. वाडेकर, एस. जी. गादेकर, वरिष्ठ लिपिक ए. बी. सावंत तसेच सहायक सहकार अधिकारी आर. एन. शेख यांच्यासह पोलिस विभागातील कर्मचाऱ्नी सक्रिय सहभाग घेतला.

मनपातील सत्ताधाऱ्यांचा वाद पोलिस ठाण्यात

शिवसेना पक्षनिरीक्षक साळवींचा आंदोलनाचा इशारा

अकोला, ब्युरो. महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेत भाजपचे सभापती विजय अग्रवाल व शिंदेसेनेचे नगरसेवक सागर भारुका यांच्यात झालेल्या वादानंतर आता शहरात राजकीय वातावरण तापले. अनधिकृत बॅनर काढण्यावरून झालेल्या वादात महापालिका कर्मचारी व शिवसेना नगरसेवकांमध्ये बुधवारी धक्काबुक्की झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. याप्रकरणी स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी सायंकाळी उशीरा शहर कोतवाली पोलिस ठाण्यात सागर भारुकांविरुद्ध तक्रार दाखल केली. यावेळी भाजपचे जयंत मनसे व पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, गुरुवारी बॅनर काढण्याच्या वादावरून शिंदेसेनेचे नेते माजी आ. गोपीकिसन बाजोरिया यांनी मूकमोर्चा काढत पोलिस ठाण्यात धडक दिली. या प्रकरणात शिंदेसेना निरीक्षक आ. राजन साळवी यांनी मनपाच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करा, अशी मागणी करत ठिय्या आंदोलनाचा इशारा दिला. यावेळी शिंदेसेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

शहरात लावण्यात आलेल्या एका बॅनरवरून वादाला तोंड फुटले. या बॅनरवर छत्रपती शिवाजी महाराज, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे फोटो होते.

सागर भारुका पोलिसांच्या ताब्यात

बुधवारी महापालिकेच्या आवारात सागर भारुका आणि विजय अग्रवाल यांच्यात पुन्हा एकदा शाब्दिक वाद झाला. या वादानंतर सागर भारुका त्यांच्या समर्थकांसह विजय अग्रवाल यांच्यावर धावून गेल्याचा आरोप होत आहे.

वनाधिकाऱ्यांविरोधात वनकर्मचाऱ्यांचा एल्गार

क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचे बेमुदत आंदोलन

अहेरी, (ता. प्र.). आलापल्ली वनविभागाचे वनपरिक्षेत्राधिकारी यांच्याद्वारे हुकूमशाही, मनमानी कारभार सुरू असून क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना गुलामाप्रमाणे वागणूक देत असल्याचा आरोप करीत वनपरिक्षेत्र कार्यालयातीलच क्षेत्रीय वनकर्मचाऱ्यांनी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याविरोधात गुरुवारपासून आलापल्ली विभागीय कार्यालयासमोर बेमूदत धरणे आंदोलन पुकारले आहे. आलापल्ली वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाचे वनपरिक्षेत्राधिकारी जी. जी. गणवीर यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करीत येथील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी बंड पुकारले. कर्मचाऱ्यांना गुलामाप्रमाणे वागणूक दिली जात असून मंजूर विकास कामे केवळ २५ ते ३० टक्के खर्चात पूर्ण करण्यासाठी दबाव टाकला जात आहे. जिल्हा वार्षिक नियोजन अंतर्गत २०२४ ते आजपर्यंतची झालेली कामे निकृष्ट दर्जाची करण्यात आल्याने या कामाची चौकशी करण्यात यावी, कामे झालेल्या मजुरांची मजुरी तीन महिने अदा न करणे, क्षेत्रीय महिला कर्मचाऱ्यांना अभद्र भाषेचा वापर करून मानसिक दबाव आणत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला.

“ वनपरिक्षेत्र कार्यालयाअंतर्गत येत असलेल्या क्षेत्रिय कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या कामामुळे वनविभागाची प्रतिमा मलिन झाली होती. यासंदर्भात मागील पाच-सहा महिन्यांपासून तक्रार वाढल्या होत्या. यासंदर्भाने संबंधित कर्मचाऱ्यांना खडसावित त्यांना जाब विचारला. कामात अनियमितता आढळल्याने त्यांच्या कामाची चौकशीही आरंभली होती. मात्र यामुळे त्यांचे आर्थिक हितसंबंध दुखावल्या गेल्याने ते माझ्यावर खोटे आरोप करून शिंतोडे उडवित आहेत. वरिष्ठ स्तरावर दबाव आणण्याचा त्याचा प्रयत्न सुरू आहे.

– जी. जी. गणवीर,
वनपरिक्षेत्राधिकारी, आलापल्ली.

प्रदूषणमुक्तीचा प्लॅन तयार

पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांची ग्वाही

चंद्रपूर, ब्युरो. औद्योगिक जिल्हा म्हणून चंद्रपूरची ओळख आहे. उद्योगांच्या विरोधात आम्ही नाही. मात्र उद्योगांनी सुद्धा नियमाप्रमाणे चालावे. नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचा कोणालाही अधिकार नाही. येथील उद्योगांमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे, याची जाणीव आपल्याला आहे. त्यामुळेच चंद्रपूर येथे येऊन प्रत्यक्ष पाहणी केली. प्रदूषणमुक्ती संदर्भात सुरवातीला चंद्रपूरचा एक वर्षाचा, नंतर ३ वर्षाचा आणि दीर्घकालीन प्लान तयार करण्यात येईल, अशी ग्वाही पर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली. दुर्गापूर येथील चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्राच्या कन्व्हेअर बेल्ट, बेलसणी येथील महामाया कोल वॉशरीज आणि घुग्घुस येथील विदर्भ मिनरल एनर्जी या कंपनीला भेट देऊन मुंडे यांनी प्रदूषणाची गुरुवारी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी नागरिकांशी संवाद साधला. कार्यक्रमाला आ. सुधीर मुनगंटीवार, जिल्हाधिकारी वसुमना पंत, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, चंद्रपूरचे उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम, तहसीलदार विजय पवार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्डाचे अधिकारी यादव आदी उपस्थित होते.

भारतीय भूचुंबकत्व संस्था, मुंबई
Indian Institute of Geomagnetism, Mumbai
(विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग, भारत सरकार अंतर्गत स्वायत्त संस्था)
(An Autonomous Body under Dept. of Science & Technology, Government of India)

अॅड. क्रमांक 02/IIG/HRD/2026 दिनांक: 15 एप्रिल 2026
IIG मुंबई भौतिकशास्त्र (स्पेस फिजिक्स) 2026 मध्ये इंटिग्रेटेड एमएस(आर)-पीएचडी प्रोग्राममध्ये प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज आमंत्रित करते. तपशीलवार जाहिरातीसाठी, कृपया भेट द्या: https://iigm.res.in/admissions/integrated-msr-ph-d.

रजिस्ट्रार
cbc36127/12/0002/2627

...तर सरनाईक ड्रायव्हर असते : मेहता

'लेटर बॉम्ब'नंतर राजकारणात खळबळ

मीरा-भाईंदर. मीरा-भाईंदरच्या राजकारणात वक्तव्यांच्या पातळीवरून नवा वाद निर्माण झाला आहे. आमदार नरेंद्र मेहता यांच्या एका विधानावरून युवासेनेचे कार्याध्यक्ष पूर्वेश प्रताप सरनाईक यांनी खुले पत्र लिहून त्यांना संयम आणि जबाबदारीची जाणीव करून दिली आहे. मेहता यांनी इतकी जमीन माझी असती तर सरनाईक माझे ड्रायव्हर असते, असे वक्तव्य केले होते. या विधानावर सरनाईक यांनी तीव्र आक्षेप घेत राजकीय संस्कृतीच्या घसरणीचे उदाहरण असल्याचे म्हटले.पूर्वेश सरनाईक यांनी पत्रात नमूद केले की, लोकशाहीत मतभेद स्वाभाविक असले तरी शिष्टाचार पाळणे आवश्यक आहे.

संयम ही कमजोरी नाही

मंत्री सरनाईक यांनी यापूर्वी मेहता यांच्या मालकीच्या जमिनीबाबत वक्तव्य केले होते, त्यावरून हा वाद चिघळला. "संयम हा आमचा स्वभाव आहे, कमजोरी नाही," असा इशारा देत पूर्वेश यांनी भविष्यात अशा वक्तव्यांकडे दुर्लक्ष केले जाणार नाही, असेही स्पष्ट केले. या 'लेटर बॉम्ब'नंतर सोशल मीडियावर समर्थकांमध्ये जोरदार वाद सुरू झाला आहे.

चालती बैलगाडी पडली १२ फूट खोल खड्यात

दोन जण गंभीर, बैल दगावल्य

यवतमाळ, ब्युरो. मारेगाव तालुक्यातील कुंभा महसूल मंडळात सुरू असलेल्या पुलाच्या कामाने अक्षरशः 'मृत्यूचा सापळा' रचला आहे. सुरक्षा उपाययोजना न करता खोदलेल्या १२ फूट खोल खड्ड्यात बैलगाडी कोसळून दोन शेतकरी गंभीर जखमी तर एका बैलाचा जागीच मृत्यू झाला. संदीप चहाणकर व महादेव बोंडे दोघेही रा. रामेश्वर असे या घटनेतील गंभीर जखमी शेतकऱ्यांची नावे आहे. रामेश्वर ते कोथुर्ला मार्गावर पुलाचे काम सुरू आहे. मात्र, संबंधित कंत्राटदाराने या रस्त्यावर १२ फूट खोल खड्डे खोदून ठेवले आहे. यावर कोणतीही सुरक्षा उपाययोजना, जसे की कठडे किंवा सूचना फलक, ठेवलेले नाही. संपूर्ण रस्ता अंधारात असल्याने, तो रस्ता सरळ 'मृत्यूकडे नेणारा मार्ग' बनला आहे. वळण रस्त्यावर कोणतेही रिफ्लेक्टर किंवा दिशादर्शक नसल्यामुळे धोका अधिकच वाढला आहे.

मंगळवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास शेतकरी संदीप, महादेव आणि प्रसाद झाडे हे बैलगाडीने कोथुर्ला येथे गहू देण्यासाठी जात होते. मात्र, रस्त्यावर कोणतीही सूचना नसल्यामुळे त्यांची बैलगाडी थेट खोदलेल्या खोल खड्ड्यात कोसळली. या अपघातात संदीप आणि महादेव गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर चंद्रपूर वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू आहे.

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे
बांधकाम कामासाठी निविदा सूचना

निविदा क्र.: **सीएओ/सी/बीएसपी/26-27-1,** दिनांक **07/04/2026** (खुली ई-निविदा) (दोन पॅकेट प्रणाली) काम: दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या बिलासपूर विभागांतर्गत शहडोल यार्डमध्ये पाणी साचू नये म्हणून यार्ड ड्रेन आणि इतर गटारांची तरतूद करणे. निविदा किंमत: ₹222318069.37/-, बयाना ठेव: ₹4446400.00/-, निविदा दस्तऐवज मूल्य: शून्य. पूर्ण करण्याचा कालावधी: स्वीकृती पत्र मिळाल्याच्या तारखेपासून 06 (सहा) महिने. **निविदा बंद होण्याची वेळ आणि तारीख:** 30/04/2026 रोजी 15:00 वाजता, निविदा उघडण्याची वेळ आणि तारीख : 30/04/2025 रोजी 15:30 वाजता. सविस्तर माहिती/निविदा दस्तऐवज, पात्रता निकष आणि इतर तपशिलांसाठी, कृपया मुख्य प्रशासकीय अधिकारी (बांधकाम) / दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, बिलासपूर, पिन:495004 , किंवा उपमुख्य अभियंता / बांधकाम / दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, रायपूर, पिन: 492009, किंवा मुख्य प्रकल्प व्यवस्थापक / पश्चिम / बांधकाम / दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर, पिन: 440001 यांच्या कार्यालयांशी संपर्क साधा, किंवा आमच्या www.ireps.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेले निविदा दस्तऐवज डाउनलोड/पहा.

उपमुख्य अभियंता / बांधकाम
सीपीआर/10/FL/18 दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, बिलासपूर
South East Central Railway @secrail

कार्यालय
नगर परिषद वाडी
ता. व जि. नागपूर

क्रमांक/नपवा/पापु व स्व वि/कावि-0177/2026 दि. 16/04/2026

शुद्धिपत्रक (मुदतवाढ) निविदा सूचना - 2026-27

नगर परिषद वाडी, जि-नागपूर यांच्या वतीने नगर परिषद वाडी पाणी पुरवठा विभागाअंतर्गत सन 2026-27 करिता निविदा मागविण्यात आल्या होत्या, परंतु विहित कालवधीत योग्य तितक्या निविदा प्राप्त न झाल्याने सदर निविदा सादर करण्याकरिता दिनांक 22/04/2026 मुदतवाढ देण्यात येत आहे. करिता विषयांकित कामासाठी योग्य त्या वर्गात नोंदणीकृत, अनुभवी व इच्छुक निविदाधारक / पुरवठादार यांनी कामाची निविदा सादर करावी.

1. नगर परिषद वाडी हद्दीतील अस्तित्वात असलेले पाणी पुरवठ्याचे विंधन विहिरी व बोरवेल मधील मोटरपंप काढणे व टाकणे तसेच मोटरपंप दुरुस्ती करणे तसेच आवश्यकतेनुसार मोटरपंप खरेदी करणे. (निविदा दरपत्रक)
2. नगर परिषद वाडी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकरिता ब्लिचिंग पावडर पुरविणे. (निविदा दरपत्रक)
3. नगर परिषद वाडी हद्दीतील अस्तित्वात असलेले जलशुद्धीकरण संयंत्र Water Atm दुरुस्त करणे (साहित्यासह) (निविदा दरपत्रक)
4. पाणी टंचाई च्या अनुशंगाने नगर परिषद वाडी करिता पाण्याचे टँकर (TRAILER MOUNTED) खरेदी करणे (ऑनलाईन)
5. सन 2026 मध्ये 27- उन्हाळ्यामध्ये उद्भवणाच्या पाणी टंचाईच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार भाडेतत्वावर ट्रक्टर टँकर व ट्रक टँकर द्वारे पाणी पुरवठा करणे. (ऑनलाईन)

(श्री. नरेश दामोदर चरडे) अध्यक्ष नगर परिषद वाडी
(सौ. कल्पना किशोर सगदेव) उपाध्यक्ष नगर परिषद वाडी
(श्री. विजय फतन मेंढे) सभापती पाणी पुरवठा व जलनिस्सारण
(ऋचा धाबडे) मुख्याधिकारी नगर परिषद वाडी

कार्यालय नगर पंचायत बेसा-पिपळा
ता. जि. नागपूर

जा.क्र.न.प.बे.पि./उद्यान विभाग/1103/2026 दिनांक :- 16/04/2026

जाहिर सूचना

खालील अर्जदाराणे त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे न.प.क्षेत्रातील बेसा-बेलतरोडी रेवतीनगर, बेसा येथील गार्डन मधील निलगिरी, करजी, व इतर प्रजातीचे चार झाडे असल्यामुळे सदर गार्डन मध्ये नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नागपूर यांचे मार्फत पाण्याचे टाकीचे काम सुरु असुन सदर विकास काम करण्यास अडथळा निर्माण झालेले आहे. सदर झाडे तोडण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज केलेला आहे. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (दुरुस्ती) अधिनियम 2017 मधील कलम 3 मधील तरतुदीनुसार ज्या नागरीकांना ही झाडे तोडण्यास हरकत आहे त्यांनी सात दिवसाच्या आत वृक्ष अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर पंचायत बेसा-पिपळा यांच्या कार्यालयात लेखी स्वरुपात कारण-मिमांसा देऊन आक्षेप नोंदवावा. सात दिवसानंतर प्राप्त होणा-या या आक्षेपाची दखल घेतली जाणार नाही.

अनु. क्र.	अर्जदाराचे नाव	झाडाचे स्थळ	झाडाबाबतची माहिती	
			झाडांची प्रजाती व संख्या	झाडाचे अंदाजे वय
1)	नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नागपूर	ख.नं. 58, रेवतीनगर ग्रार्डन मधिल, बेसा	निलगिरी, कांचन, करंजी (झाडांची संख्या-०४)	15 वर्षे

ठिकाण :- नगर पंचायत बेसा-पिपळा
स्वा/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत बेसा-पिपळा

बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda

शाखा - गोपाल नगर, नागपूर
प्लॉट नं. 9, माटे चौक, दक्षिण अंबाझरी रोड, नागपूर - 440022

वाहन ई-लिलाव सूचना

याद्वारा सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषत: कर्जदारांना आणि जमानतदारांना सूचना देण्यात येत आहे की बँकेने पक्षांनी केलेल्या गहाणखत/कर्ज करारांतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करुन खाली नमूद केलेले गहाण असलेले मोटार वाहन परत ताब्यात घेतले/जप्त केले आहे आणि खाली नमूद केलेल्या खात्यांमधील थकबाकी वसूल करण्यासाठी वाहन "जसे आहे तिथे आहे", "जसे आहे जे आहे" आणि "जे काही आहे ते" या आधारावर विकले जाईल. कर्जदार/जमानतदार/वाहन/एकूण देय/राखीव किंमत/ई-लिलाव तारीख आणि वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचे तपशील खाली खालीप्रमाणे-

अनु. क्र	कर्जदार/जमानतदार/ यांचे नाव आणि पत्ता	एकुण देय	वाहन निर्माता आणि मॉडेल आरटीओ नोंदणी क्रमांक	1. ई-लिलावाची तारीख आणि वेळ / 2. बोली सादर करण्याची शेवटची तारीख आणि वेळ	1. राखीव किंमत / 2. अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) / 3. बिड वाढीव रक्कम	ईएमडी ठेव खाते क्रमांक / आयएफएससी कोड / शाखा	वाहन / चल मालमत्ता तपासणी तारीख आणि वेळ
1	श्री. दिनेश नरेंद्र पंधराम S/o. नरेंद्र पंधराम, पत्ता : वार्ड नं. 5, कांद्री माईन, पो. कांद्री माईन, तालुका रामटेक, नागपूर - 441106.	रु. 17,06,760/- लागु न झालेले व्याज + खर्च	टाटा मोटर्स गुड्स कॅरिअर ट्रक - टीआर नोंदणी क्रमांक : MH-40-CM6312 नियमित वर्ष : 31/05/2023 मॉडेलचे नाव : टाटा मोटर्स लिमिटेड 1616 LPT DCR 49 HSD 160B6 M6 रंग : ब्रिक रेड इंधन : डिझेल इंजिन क्रमांक : 33LNGD11DWX511900 चेसिस क्रमांक : MAT563